आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२८ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या पुण्यातल्या स्वारगेट-सिविल कोर्ट मेट्रोचं आणि सोलापूर विमानतळाचं उद्घाटन

- आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून प्रधानमंत्री उद्या सकाळी ११ वाजता देशवासियांशी संवाद साधणार

- विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी अधिकाधिक मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याचं निवडणूक आयोगाचं आवाहन

**आणि**

- मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतलं भारताचं आव्हान संपुष्टात

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातल्या ११ हजार २०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामाचं उद्घघाटन, भूमीपूजन करणार आहेत. यावेळी पुण्यातल्या स्वारगेट ते सिवील कोर्ट या भुयारी मेट्रोचंही उद्घघाटन करतील. त्यांच्या हस्ते स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गाचं भूमीपुजन आणि पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या शाळेच्या स्मारकाच्या कामाचं भूमीपुजनही ते करणार आहेत. छत्रपती संभाजी नगर जवळच्या बिडकीन इथल्या ७ हजार ८५५ एकर क्षेत्रातल्या राष्ट्रीय औद्योगिक क्षेत्राचही लोकार्पण त्यांच्या हस्ते होईल. तसंच ते सोलापूर विमानतळाचं उद्घघाटनही करतील.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, newsonair हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या जनतेला आपल्या मुलांसाठी शांतता, उज्वल भवितव्य हवं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज जम्मू इथं प्रचारसभेत बोलत होते. विधानसभा निवडणुकांसाठी गेल्या दोन टप्प्यात प्रचंड प्रमाणावर झालेलं मतदान याची साक्ष असल्याचं ते म्हणाले. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्यांचा काँग्रेस कधीही आदर करू शकत नाही असा दावा त्यांनी केली. २०१६ मध्ये आजच्याच दिवशी भारतानं सर्जिकल स्ट्राईक करत पाकिस्तानला नामोहरम केल्याची आठवण मोदी यांनी यावेळी केली. हरयाणात हिसार इथंही आज प्रधानमंत्र्यांची सभा झाली. काँग्रेसनं दलित आणि मागासवर्गीयांसाठी आपले दरवाजे पूर्ण बंद करून घेतल्याचा आरोप मोदी यांनी केला. काँग्रेस सत्तेत असलेल्या राज्यात कधीही स्थिरता येत नाही. हरयाणात जनतेचा विचार करण्याऐवजी अंतर्गत वर्चस्वासाठी कलह सुरु असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

<><><><>

डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह आझाद पार्टीचे अध्यक्ष गुलाम नबी आझाद यांनी आज कलम ३७० वरुन काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सवर टीका केली. नॅशनल

कॉन्फरन्स आणि पीडीपीनं संसदेत कलम ३७० च्या मुद्द्यावर कधीही भाष्य केलं नसल्याचा दावा आझाद यांनी केला. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी जम्मूमध्ये प्रचारसभेत नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्यावर टीका केली. सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यात ते अपयशी ठरल्याचा आरोप प्रियंका गांधी यांनी केला.

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनीही सहभागी व्हावं आणि मतदानाची टक्केवारी वाढवावी असं आवाहन केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत केलं. त्यासाठी विविध शहरांमध्ये विशेष मोहिम राबवली जाणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर मुंबईत वार्ताहर परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली. मतदान केंद्रावर मतदारांना अधिकाधिक सुविधा देण्यात याव्या असे आदेश त्यांनी दिले आहेत. त्यासाठी एका मतदान केंद्रावर सरासरी ९५० मतदार असतील याची काळजी घेतल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात यंदा १ लाखांहून अधिक मतदान केंद्र असतील. शहरी भागातल्या जवळपास १०० टक्के आणि ग्रामीण भागातल्या ५० टक्के मतदान केंद्रावर web casting सुविधा दिली जाणार आहे. यावेळी १ हजार १८१ मतदान केंद्र ही उंच इमारतीमध्ये आणि २१० झोपडपट्टी मध्ये असणार आहेत. आजूबाजूच्या राज्यातून अवैधरीत्या होणारी रोख रक्कम, अंमली पदार्थ, मद्य आणि इतर वस्तूंची वाहतूक रोखण्यासाठी ३२२ चेक पोस्ट निर्माण करण्याचे आदेश दिल्याची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक आयोगानं या दौऱ्यात राज्यातल्या ११ पक्षांशी चर्चा केली. दिवाळी, देव दिवाळी आणि इतर सण ध्यानात घेऊन निवडणुकांची तारीख निश्चित करावी. सुटीच्या दिवसाला लागून मतदानाचा दिवस येणार नाही याची खबरदारी घेण्याची मागणी या पक्षांनी केल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले.

३ वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच ठिकाणी असलेल्या किंवा गृह जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तत्काळ बदली करावी आणि त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठवण्याच्या स्पष्ट सूचना मुख्य सचिवांना दिल्याचंही ते म्हणाले. निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रलोभनं दाखवली जाऊ नये यासाठी विशेष लक्ष दिलं जाणार आहे. एटीएममध्ये पैसे भरणारी वाहनं सूर्यास्तानंतर काम करणार नाहीत. तसंच ऑनलाइन पैसे हस्तांतरणात अचानक काही वेगळ्या घडामोडी दिसून आल्या तर तत्काळ कळवण्याच्या सूचना बँकांना दिल्या आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर यांची आज जयंती. ७० वर्षाहून जास्त काळाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत लता मंगेशकरांनी गायलेली २५ हजारांपेक्षा जास्त गाणी ध्वनिमुद्रीत झाली आहेत. लता मंगेशकरांचे बंधू ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रद्धांजलिपर लिहिलेल्या लेखात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लता दिदींमधील बहिण-भावाच्या नात्याचे अनोखे बंध उलगडले. प्रधानमंत्री म्हणून मोदी यांनी केलेली कामं आणि देशात केलेले सकारात्मक बदलांचा लता मंगेशकर यांना सार्थ अभिमान होता. लाखोंच्या दीदी असलेल्या लता मंगेशकर या नरेंद्र मोदी यांना प्रेमाने भाई अशी हाक मारत. त्या दरवर्षी प्रधानमंत्री मोदी यांना राखी पाठवत आणि प्रधानमंत्री मोदी हे देखील त्यांना दूरध्वनी किंवा पत्राद्वारे प्रतिसाद देत, अशी आठवण हृदयनाथ मंगेशकर यांनी जागवली.

<><><><>

भारतात २०२३-२४ या आर्थिक वर्षात १४४ अब्ज टन पोलाद निर्मिती झाली असून भारत पोलाद निर्मिती करणारा जगातला दुसरा देश असल्याचं केंद्रीय अवजड उद्योग आणि पोलाद राज्यमंत्री भुपतीराजु श्रीनिवास वर्मा यांनी म्हटलं आहे.

खनिज, धातू, धातूशास्त्र परिषदेच्या उद्घाटनावेळी ते काल नवी दिल्ली इथं बोलत होते. पोलाद उद्योगातली कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानातल्या नवोन्मेषाचं वर्मा यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा' अभियान सध्या सर्वत्र राबवलं जात आहे. या अभियानाविषयी अभिनेता सुशांत शेलार यांनी दिलेली माहिती….

**होल्ड --- बाईट... सुशांत शेलार (२० सेकंद)**

**<><><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीत आज भारताच्या त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना उपांत्य फेरीत पराभव झाल्याने स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं. त्रिसा आणि गायत्री या जोडीला चिनी तैपेईच्या हुंग-एन-त्झु आणि सिएह पेई शान जोडीकडून 21-17, 16-21, 21-10. असा पराभव स्विकारावा लागला. याआधी भारताच्या किदम्बी श्रीकांतलाही  पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत हार पत्करावी लागल्याने भारताचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या आणि अंतिम सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचा खेळ पावसामुळे रद्द झाला. काल पावसामुळं खेळ थांबला तेव्हा बांग्लादेश  ३ गडी बाद १०७ धावांवर खेळत होता.

**<><><><><>**

१७ वर्षाखालील सॅफ फुटबॉल चषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतानं नेपाळला ४-२ असं पराभूत केलं. भूतानमधल्या थिंपू इथं हा सामना झाला. उपांत्य फेरीतल्या दुसऱ्या सामन्यात बांग्लादेशानं पाकिस्तानच्या संघाला पेनल्टी शूटआऊटमध्ये ८-७

असं पराभूत केलं. अंतिम सामन्यात सोमवारी भारताचा सामना बांग्लादेश सोबत होईल.

**<><><><><>**

ओसीआय कार्डधारकांसाठी कोणतेही नवे बदल केले नसल्याचं न्यूयॉर्कमधल्या भारतीय वाणिज्य दूतावासानं भारतीय अमेरिकन समुदायाला कळवलं आहे. ओसीआय कार्डधारकांवर बंधनं आणल्याचा दावा करणारं वृत्त दूतावासानं समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे फेटाळलं आहे. ओसीआय कार्डधारकांना ४ मार्च २०२१ च्या अधिसूचनेद्वारे दिलेले अधिकार कायम असल्याचं दूतावासानं स्पष्ट केलं.

**//<><><><><>//**